## ‘मिलावटी सरकार’चा बचाव

*भाजपने स्वतःच्या शुद्धतेचा कर्कश्श टाहो फोडणं हे मुळात लोकशाहीमधील भेसळीचं निदर्शक आहे.*

विरोधकांमधील एकजुटीला गती मिळत असताना भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) कंपूमधील अस्वस्थता दृश्यमान होऊ लागली आहे. पक्षाच्या उच्चपदस्थ नेतृत्वाकडून वारंवार केली जाणारी कर्कश्श विधानंही याचाच दाखला देतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच विरोधकांच्या एकजुटीची टिंगल गेली आणि ‘भेसळीचं सरकार’ (मिलावटी सरकार) स्थापन करण्यासाठीचे हे प्रयत्न असल्याची टीका केली. या विरोधी पक्षांच्या आघाडी सरकारच्या शक्यतेवर अमित शाह यांनीही ताशेरे मारले. अशा सरकारला दर दिवशी नवीन पंतप्रधान आणावा लागेल, असं शाह म्हणाले. मावळत्या लोकसभेच्या संसदीय सत्रामध्ये अखेरच्या दिवशी केलेल्या भाषणात मोदींनी असं मत मांडलं की, स्थैर्यासाठी बहुमताचं सरकार गरजेचं आहे आणि असं सरकार सत्तेत असल्यामुळेच भारताचा जागतिक दर्जा उंचावला आहे.

विरोधकांच्या आघाडीचा नेता कोण असेल, असा प्रश्न सातत्याने उपस्थित करून राष्ट्रीय नेतृत्वासंबंधी आपल्या पक्षाने केलेल्या दाव्याचा बचाव करण्याचा प्रयत्न भाजपसमर्थक करत आहेत. देशामध्ये स्थिर सरकार स्थापन करण्याची क्षमता असलेला एकमेव एकजिनसी पक्ष भाजप हाच आहे, असं मतदारांच्या मनात भरवून देण्याच्या हेतूने ‘मिलावटी सरकार’चा बागुलबुवा उभा करायची भाजपची राजकीय योजना आहे. स्वतःच्या कामगिरीच्या सामर्थ्यावर मतं मागणं भाजपला आता शक्य नाही, त्यामुळे मिलावटी सरकारसारखे शब्द वापरून मतदारवर्गाला जागं करायची खटपट हा पक्ष करतो आहे. पण स्थैर्य व एकजिनसीपणा यांबद्दल भाजप करत असलेले दावे मुळातच लोकशाहीच्या विरोधात जाणारे आहेत.

निवडणुकीय प्रक्रियेमध्ये अनेक व भिन्नस्वरूपी राजकीय पक्षांचा सहभाग असतो आणि त्यांना एकत्र काम करावं लागतं, हे राजकीय वास्तव लक्षात घेऊन विरोधकांच्या आघाडीकडे पाहायला हवं. सामाजिक गटांच्या बहुविध पण वैध आकांक्षेची ही अस्सल राजकीय अभिव्यक्ती आहे. तर एकाधिकारशाही मानणाऱ्या पक्षाच्या विरोधात अशा प्रकारे लोकशाही अभिव्यक्ती होणं म्हणजे संबंधितांचं सरकार भेसळीचं किंवा दूषित असतं, असं भाजप मानतो. भाजपच्या एकसाची परिप्रेक्ष्यातून जी गोष्ट भेसळीची ठरते ती भारतातील विभिन्न व असमान सामाजिक वास्तवाशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक आहे. भिन्नरूपी राजकीय शक्तींच्या एकत्र येण्याने राज्यव्यवस्थेचं संघराज्यीय स्वरूप अधोरेखित होतं आणि विद्यमान सरकारच्या केंद्रीकरणवादी व एकजिनसी प्रवृत्तीवरही प्रकाश पडतो. भाजप/राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) यांच्याविरोधात एकत्र आलेले विविध विरोधी पक्ष भिन्न सामाजिक शक्तींचं, प्रदेशांचं व अस्मितांचं प्रतिनिधित्व करतात. एकच पक्ष या भिन्नतेचं प्रतिनिधित्व करतो, असा दावा करता येणार नाही. त्यामुळे, बहुविध- प्रसंगी परस्परविरोधी- मतं व हितसंबंध सामावून घेण्यासाठी अशा आघाडीचं सरकार आवश्यक आहे. सामावून घेण्याच्या या प्रक्रियेमध्ये तडजोडीचा घटकही अंतर्भूत आहे आणि तोच केंद्रातील स्थैर्याची हमी

देणारा आहे. विद्यमान सरकारचा भेसळरहित एकप्रवाही व्यवहार केवळ सामाजिक तफावत वाढवणाराच आहे.

पंतप्रधान कार्यालयाकडे सध्या ज्या प्रकारे प्रचंड सत्ता एकवटली आहे आणि सरकारच्या मंत्रिमंडळ व्यवस्थेला ज्या पद्धतीने मोडकळीला आणलं जातं आहे, त्यातूनही या एकप्रवाही वृत्तीचं प्रदर्शन घडतं. एकाच पक्षाला निर्णायक प्राबल्यावर दावा सांगता येणार नाही अशा आघाडी सरकारमुळे मंत्रिमंडळीय व्यवस्था पुनर्स्थापित होईल. अशा व्यवस्थेत पंतप्रधान पद हे समानांमध्ये प्रथम स्थानी असतं आणि मंत्रिमंडळ संसदेला सामूहिकरित्या उत्तरदायी असतं. परंतु, गेल्या पाच वर्षांमध्ये पंतप्रधान कार्यालयाकडे सत्तेचं इतकं केंद्रीकरण झालं आहे की संसदीय संस्था क्षीण झाली आहे आणि लोकाधारित प्रतिनिधित्वाच्या लोकशाही तत्त्वाचाही ऱ्हास झाला आहे. संसदीय लोकशाहीला अशा छुप्या पद्धतीने राष्ट्राध्यक्षीय रचनेचं रूप देण्यामागे एकाधिकारशाही प्रवृत्ती कार्यरत आहे. त्यामुळे आज संसदेची भूमिका पुनर्स्थापित करण्यासाठी व राजकीय प्रक्रियेमध्ये लोकेच्छा पुन्हा आणण्यासाठी आघाडी सरकार आवश्यक बनलेलं आहे.

मूलभूत पातळीवर लोकशाही ही अस्थिर असणारी व अस्थिर करणारी व्यवस्था असते, त्यात सातत्याने स्पर्धा असते, राजकीय शक्तींचे परस्परसंबंध बदलतात आणि कोणतीही राजकीय शक्ती वा घटक कायमस्वरूपी टिकण्याला या व्यवस्थेत पायबंद घातला जातो. त्यामुळे, ५० वर्षं सत्ता गाजवण्याची बढाई किंवा विरोधी पक्षांनी या निवडणुकांबाबत उमेद ठेवू नये आणि पुढील निवडणुकांसाठी तयारी सुरू करावी, असे शेरे लोकशाहीला धरून नाहीत. केंद्रातील सरकारं सातत्याने बदलत असतं किंवा कोलमडून पडणं, असा लोकशाहीमधील या जहाल अस्थिरतेचा अर्थ नाही. काँग्रेसेतर, भाजपेतर आघाडी सरकारांचे गतकाळातील प्रयोग हे तथाकथित राष्ट्रीय पक्षांच्या वरचढपणाच्या व्यवहारामुळे अस्थिर झाले, हेही इथे नमूद करायला हवं. सामाजिक क्षोभ व मंथन अशा प्रकारच्या वारंवार बदलांना कारणीभूत ठरतात, पण स्थैर्याच्या नावाखाली अशा प्रयत्नांना आधीच थोपवणं हे लोकशाही प्रक्रियेला छेद देणारं आहे. अशा प्रकारचं लोकशाही अस्थैर्य जनतेला सक्रिय भूमिका पार पाडण्याचा अवकाश देतं आणि व्यवस्थेची चौकट केवळ मोजक्यांच्या नव्हे तर अनेकांच्या हितसंबंधांना व कल्याणाला जागा करून देण्यासाठी विस्तारण्याचा प्रयत्न केला जातो. (एकसाची एकपक्षीय सरकारपेक्षा) लवचीक वीण असलेल्या आघाडी सरकारद्वारे लोकाभिमुख धोरणांच्या शक्यता वाढवल्या जातात. सत्ताधारी आघाडीमधील विरोधाभासांचा उपयोग या साध्यासाठी केला जाऊ शकतो. भाजपचं सरकार मजबूत आहे, तर विरोधकांची एकजूटच मजबूर आहे, अशी टिप्पणी अमित शाह यांनी केली, त्याकडेही या संदर्भातच पाहावं लागतं. लोकशाहीमध्ये लोकांचे हितसंबंध व दबाव यांच्यासमोर सरकारने मजबूर असणंच अपेक्षित आहे. याउलट तथाकथित मजबूत सरकार जनतेच्या इच्छेबाबत उदासीन व वैरभावी असू शकतं. ●

परिवर्तनाचा वाटसरू

**लेख/वर्गणी पाठवण्याचा/पत्रव्यवहाराचा नवा पत्ता**

परिवर्तनाचा वाटसरू, ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११

भ्र. ७७७६९०२२६७

# विष आणि मृत्यू यांचं उत्पादन

*मद्य सुरक्षित असेल याची खातरजमा करण्याऐवजी नुकसानभरपाई देऊन सरकारं स्वतःची सुटका करून घेऊ पाहतात.*

उत्तर प्रदेश व उत्तराखंड इथे अवैध दारू प्यायल्यामुळे ११६ लोकांचा मृत्यू झाला, त्यामुळे संपूर्ण दारूबंदी विरुद्ध समंजसपणे सुरक्षित मद्यसेवन हा वाद पुन्हा एकदा प्रकाशात आला आहे. सध्या ज्या पद्धतीने मद्यसेवन केलं जातं त्यामुळे कमी उत्पन्न आणि कमी-मध्यम-उत्पन्न गटातील देशांमधील आजार व हानीची जोखीम अवाजवी प्रमाणात वाढते, त्या तुलनेत उच्च-उत्पन्न गटातील देशांना ही जोखीम कमी प्रमाणात पत्करावी लागते. मद्याच्या प्रकारासोबतच इतरही घटक या विषम परिस्थितीला कारणीभूत असतात. बनावट दारू प्यायल्याचे प्राणघातक परिणाम सर्वांत गरीब आणि निराधार घटकांना सरसकटपणे सहन करावे लागतात. अशा शोकांतिका व त्यानंतरच्या घटनाक्रमाचा आकृतिबंध निश्‍चित स्वरूपाचा असल्याचं दिसतं. गरिबांच्या बाबतीत परिस्थिती शमवणारी भरपाई देऊ करणं इतकाच प्रतिसाद सरकार देतं आणि रोष निवळवण्याचा प्रयत्न केला जातो. खराब दर्जाची दारू प्यायल्यामुळे आर्थिकदृष्ट्या सबळ घटकांमध्ये असे मोठ्या संख्येने मृत्यू झाले, तरीही सरकार असाच प्रतिसाद देईल का?

अशा प्रकारच्या मृत्यूच्या दुर्दैवी घटना इतक्या सर्रास आहेत की त्यातील मृतांचा आकडा मोठा असला तरीही दोन दिवसांपलीकडे त्यावर चर्चा होत नाही आणि लोक त्यात जास्त रसही घेत नाहीत. रडणाऱ्या बायकामुलांची छायाचित्रं, भरपाईच्या घोषणा आणि काही थोड्या लोकांना अटक- असा घटनाक्रम पार पडून प्रकरण ठप्प होतं. परंतु, यावेळी उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी या घटनाक्रमाला एक नवीनच वळण दिलं. राज्य सरकारने एक विशेष तपास पथक स्थापन केलं आणि या मृत्यूंमागे विरोधकांचं काही 'कारस्थान' आहे का याचा तपास करण्याचे आदेश या पथकाला देण्यात आले आहेत. मृत्यूसारख्या प्रसंगातही गरीबांनी एखाद्या राजकीय वर्गाच्या उपयोगी पडावं, अशी अपेक्षा ठेवली जाते!

भारतातील दारूबंदीची परिणामकारकता किती असते/असेल याविषयी दीर्घकाळ वाद आणि चर्चा होत आलेली आहे. बंदी केली की अवैध व खराब दारूचं समांतर उत्पादन आणि विक्री सुरू होण्याचा धोका असतो. राजकारण्यांना- विशेषतः सत्ताधारी राजकीय वर्गाला सुसूत्रीकरण व गुणवत्ता यांसाठी अधिक सजगपणे पावलं उचलण्याऐवजी दारूबंदी करणं अधिक सोपं वाटतं. मद्यपींच्या कुटुंबीयांना या व्यसनाचा फटका बसतो, हे व असे दावे करून नैतिक भूमिका घेणं सोपं आहे आणि असा दावा करून दारूबंदीचं आवाहन करणंही सोपं आहे. परंतु, दारूबंदीच्या काळातही आर्थिकदृष्ट्या संपन्न समाजघटकांना ब्राण्डेड मद्य मिळवणं परवडतं, तर सरकारी 'देशी दारू'ची जागा बनावट दारू उद्योगाकडून व्यापली जाते. इतक्या वर्षांमधील माध्यमांच्या वार्तांकनामध्ये नमूद केल्यानुसार, पिणाऱ्या व्यक्तीला जवळपास तत्काळ मृत्युमखी पाडणारी दारू ही छुप्या पद्धतीनेच तयार केलेली असते. कर चुकवण्यासाठी हा छुपा उत्पादनमार्ग पत्करला जातो. मोठ्या प्रमाणात मिथेनॉल, बॅटरी आम्ल, जुन्या चामड्याच्या वस्तू व इतर काही घटकांनी ही दारू बनवली जाते, त्यातही स्वच्छतेकडे सर्वाधिक दुर्लक्ष केलं जातं. यातील कोणताही घटक प्रमाण व परिस्थिती यांनुसार प्राणघातक ठरू शकतो. यातून कधी मृत्यू झाला नाही तरी अवयवांना गंभीर इजा पोचण्याची शक्यता वाढतेच, त्यातून अंधत्वासह इतरही काही अपंगत्व येण्याचा धोका वाढतो.

अलीकडे झालेल्या या मृत्यूंमागे कारस्थान असावं, असा संशय घेणं हा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचा या संदर्भातील अग्रक्रम होता. त्याचप्रमाणे दारूबंदीला अग्रक्रम देणारे लोकही वास्तवाकडे स्वेच्छेने काणाडोळा करत असतात. किंबहुना, एका राज्यामध्ये सरकारने ग्राहकांविषयी चिंता व्यक्त करून मान्यताप्राप्त देशी दारूच्या दुकानांसाठी व्यवहार 'अधिक अवघड' बनवला. परंतु, भारतीय बनावटीच्या परदेशी दारूची विक्री वाढवण्यासाठी ही कृती करण्यात आल्याचे आरोप झाले आहेत. या सगळ्या कृती गरीब ग्राहकांविषयीच्या आस्थेपोटी नसून तुच्छताभावामुळे झाल्याचं दिसतं. मद्यसेवन होऊच नये, ही अपेक्षा अवास्तविक आहे. गुणवत्तेचं नियंत्रण व नियमन होईल याची खातरजमा करणं, हीच शहाणपणाची भूमिका आहे. राजकीयदृष्ट्या सोयीस्कर व प्रशासकीयदृष्टचा सुलभ पर्याय स्वीकारण्याऐवजी सरकारांनी जास्तीची पावलं उचलायला हवीत. बनावट दारू बनवणाऱ्या टोळ्यांवर पोलिसांनी कारवाई करायला हवी आणि नियम व गुणवत्ता नियमनाची कठोर अंमलबजावणी करण्याला प्राधान्य द्यायला हवं.

अवैध दारू प्यायल्याने मुंबईत २०१५ साली १०६ जणांचा मृत्यू झाला, तर पश्चिम बंगालमध्ये २०११ साली याच कारणामुळे १७० जण मृत्युमुखी पडले. या संदर्भात जवळपास प्रत्येक राज्यामध्ये भयंकर आकडेवारी सापडते आणि त्याहून भयानक मृत्युकहाण्या सापडतात. शिवाय अधिकृतरित्या नोंदवल्या न गेलेल्या किंवा अल्पसंख्येने नोंदवल्या गेलेल्या प्रकरणांचा मुद्दा वेगळाच आहे. दारू हा राज्याच्या अखत्यारितील विषय आहे, त्यामुळे प्रत्येक राज्य सरकारने पूर्ण विचारान्ती उपाय आखायला हवेत आणि ते अंमलात येतील अशी तजवीज करायला हवी. तामीळनाडूत २००१ सालापासून दारूची विक्री करण्यावर राज्य सरकारची घाऊक मक्तेदारी आहे आणि २०१४-१५ सालापासून तिथे एका सरकारी संस्थेकडून कमी दरामध्ये दारू विकली जाते. तामीळनाडूचा दाखला अनुकरणीय आहे, कारण तिथे गरीबांना मद्यसेवनाचे सुरक्षित पर्याय पुरवण्यात आलेले आहेत.

तुच्छताभावी स्वरूपाची नैतिक-ढोंगी भूमिका सोडून देऊन गरीब मद्यपींबाबत अस्सल आस्था दाखवणारी उपाययोजना केली, तरच सरकारला असे सरसकट मृत्यू रोखता येतील.

●

## समाजमाध्यमांचं लोकशाहीकरण शक्य आहे का?

*मतांची बाजारपेठ, अशा स्वरूपाची रचना असलेली समाजमाध्यमं विशेषाधिकाराला आणि विशेषाधिकाऱ्यांना पूरक ठरताना दिसतात.*

समाजमाध्यमांवरील 'नागरिकांच्या अधिकारांचं संरक्षण' करण्यासंदर्भात चर्चेसाठी ट्विटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी जॅक डोर्सी यांनी आपल्या समितीसमोर हजर राहावं, अशी सूचना अनुराग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखालील ३१ सदस्यीय संसदीय समितीने केली होती. ट्विटरने काही 'संशयास्पद' खाती बंद केली, त्या संदर्भात ही सूचना करण्यात आल्याचे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. फेसबुकसारख्या इतर समाजमाध्यम मंचांनाही अशा समितीसमोर हजर राहायला सांगावं, अशी भारतीय जनता पक्षातील (भाजप) लालकृष्ण अडवाणींसह इतरही काही ज्येष्ठ नेत्यांची मागणी आहे, असं बातम्यांमध्ये आलेलं आहे.

२०१९च्या सार्वत्रिक निवडणुका जवळ आल्या असताना विद्यमान सरकारने समाजमाध्यमांमध्ये विशेष रुची घेतल्याचं दिसतं. निवडणुकीय राजकारणातील समाजमाध्यमांच्या भूमिकेविषयी प्रश्न उपस्थित

करण्याची गरज आहेच, पण तत्पूर्वी त्यांच्या चौकशीमधील ‘अंधत्वा’ची तपासणी करणं गरजेचं आहे. डिजीटल अवकाशाने भारतातील सार्वजनिक अवकाशामध्ये मूलभूत बदल केले आहेत. ‘वृत्तसंकलना’च्या प्रक्रियेमध्ये आता रचनात्मक बदल झाले आहेत. छापील व दूरचित्रवाणी माध्यमं आणि नवमाध्यमं अधिकाधिक परस्परावलंबी होत चालली आहेत. पण या रचनात्मक बदलांचा सार्वजनिक संभाषितावर कितपत परिणाम होतो? याचं प्रतिबिंब मतांमध्ये पडताना दिसतं का? भारतातील प्रचलित सामाजिक-आर्थिक व सांस्कृतिक विषमतांमुळे डिजीटल अवकाशामधील प्रवेशाला मर्यादा येते, त्यातील संवाद व पोचही मर्यादित होते. अशा वेळी डिजीटल अवकाशामधील संवाद हा प्रत्यक्षातील राजकीय वास्तवाचं प्रतिनिधित्व करतो असं मानता येईल का?

निवडणुकांवर प्रभाव टाकण्यासाठी अस्त्र म्हणून समाजमाध्यमांचा वापर कसा करता येईल, याचे काही मार्ग (प्रचारमोहिमांचा वापर, गाळणी बुडबुडे, छळ, ट्रोलिंग, खोटे मतप्रवाह सुरू करणे) डोनाल्ड ट्रम्प यांच्या अमेरिकेतील अध्यक्षपदाच्या निवडीवेळी दिसून आले. समाजमाध्यमांवरील अभिव्यक्तीचे वास्तव जगामध्ये कोणते पडसाद उमटतात, याबद्दल सावध असलेल्या समाजमाध्यम कंपन्या कायदेशीर कटकटी टाळण्यासाठी स्वतःला प्रकाशकाच्या जबाबदाऱ्यांपासून मोकळं ठेवू पाहत आहेत. ट्रम्प यांच्या निवडणुकीनंतर फेसबुकचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकेरबर्ग यांना उत्तरदायी ठरवण्यात आलं होतं. तेव्हापासून त्यांनी फेसबुक अधिक पारदर्शक करण्याचं ‘आश्वासन’ दिलं आहे. इतर मंचांनीही हाच मार्ग स्वीकारला आहे. राजकीय पक्षांशी संबंधित जाहिराती वापरकर्त्यांच्या न्यूजफीडमध्ये कशा रितीने येतील यासंबंधी फेसबुकने नुकतेच काही बदल जाहीर केले आहेत, तर ट्विटरनेही खात्यांवर आणि द्वेषमूलक अभिव्यक्तीवर अधिक सजग देखरेख ठेवायचे प्रयत्न सुरू केले. भारतामध्ये निवडणुकांमध्ये पारदर्शकता राहावी आणि स्पर्धेला समान भूमी लाभावी यासाठी समाजमाध्यमांच्या वापराबाबत निवडणूक आयोगाने काही सूचना तयार केल्या आहेत. पण हे उपाय तात्कालिक प्रतिसादासारखे आहेत, त्यातून समस्येच्या व्याप्तीवर पुरेसा प्रभाव पडणार नाही. वास्तव जगामध्ये मुक्त व निःपक्षपाती निवडणुका व्हाव्यात यासाठी डिजीटल लोकशाही जतन पुरेसं आहे का, या प्रश्नाचं उत्तर आपल्याला देता यायला हवं. डिजीटल-सामाजिक अवकाश हे आपल्या सामाजिक अस्तित्वाचं विस्तारित क्षेत्र आहेत हे लक्षात घेऊन त्यातील आपल्याला असुरक्षित करणाऱ्या घटकांना ओळखणं गरजेचं आहे, तरच यावर उपाय करता येतील. समाजमाध्यमांच्या संदर्भात समान भूमी तयार करणं, म्हणजे काय? इंटरनेट हा अंगभूतरित्या समतावादी अवकाश आहे, असं आपण गृहीत धरतो, पण त्यातील काही आवाज मोठे का केले जातात आणि इतर आवाजांना काहीच श्रोते का लाभत नाहीत? डिजीटल लोकशाही हे एक मिथक आहे, असं माध्यम अभ्यासक म्हणतात. मुळातच डिजीटल अवकाशाची रचना असमान आहे. विशेषाधिकाराच्या पारंपरिक रचना ओलांडत असतानाच दडपशाहीच्या रचना कायम ठेवून त्यांची पुनरावृत्ती करण्याचं कामही याच अवकाशाकडून होत असतं.

जास्त भांडवल असलेले निनावी खाजगी घटक स्वतःच्या मतांना अधिक अवकाश मिळावा यासाठी पैसे खर्चू शकतात, त्यातून त्यांचा आवाज परिणामकारकतेने वाढत जातो. इंटरनेटवरच्या प्रत्येक आवाजाला सारख्याच प्रकारचा ग्राहकवर्ग लाभत नाही. निवडणूक जिंकली जात नाही तोपर्यंत विरोधकाहून चढ्या सुरात ओरडत राहाणं, हे डिजीटल अवकाशातील राजकीय संभाषिताचं स्वरूप आहे. यामुळे राजकारणाच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम होतो. मतपेढीला चालना देण्यासाठी मोठे राजकीय पक्ष ज्या प्रकारची संसाधनं वापरू शकतात त्यांच्याशी स्पर्धा

करणं तळपातळीवरील आवाजांना शक्य नसतं.

समाजमाध्यमांवर राजकीय पक्ष किती खर्च करतात याची छाननी करणं शक्य आहे, पण राजकीय पक्षांच्या वतीने व्यक्तींनी खर्च केलेल्या पैशाची छाननी करता येईल का? सामाजिक माध्यमांच्या रचनेतील या धुसर दुव्यांमुळे राजकीय पक्षांना नफादायकता व लोकप्रियता अशी दुहेरी लक्ष्य साधणं शक्य झालं आहे. वापरकर्त्यांना अधिक गुंतवून ठेवेल अशा आशयाला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित केलं जातं, मग तो आशय कितीही प्रक्षोभक असला तरी चालतो. समाजमाध्यमं ही काही विचारसरणी किंवा एखादी आदर्श वा नैतिक संस्था नाही, तर नफा कमावण्यासाठी कंपन्यांनी तयार केलेलं एक उत्पादन आहे, हे आपण विसरतो. लोकशाहीचा मुखवटा धारण करणाऱ्या या मंचाच्या आचरणामागील तत्त्व लोकशाहीवादी नाही, तर व्यावसायिक आहे. थोडक्यात, ही 'मतांची बाजारपेठ' आहे.

यामुळे डिजीटल अवकाशातील राजकीय संभाषिताचं धृवीकरण झालं आहे. इंटरनेटमुळे मिळणारं निनावी अस्तित्व अभिव्यक्तीस्वातंत्र्याला पूरक ठरेल, आणि लोकशाही टिकवण्याला मदतीचं होईल, असं मानलं जात होतं. पण राजकीय अभिजनांनी निनावी अस्तित्व, भांडवल आणि तंत्रज्ञान यांचे कुटील परस्परसंबंध रचून जनमत प्रभावित करायला सुरुवात केली, राजकीय कार्यक्रमांना चालना दिली आणि बनावट व दिशाभूल करणाऱ्या बातम्या व माहिती प्रसृत करायलाही या माध्यमांचा वापर केला. हे हितंबंधी जाळं निवडणुकीय राजकारणाच्या आरोग्यासाठी हितकारक नाही आणि 'जगातील व्यापक लोकशाही'ला तर अजिबातच हिताचं नाही. या समस्यांवर उपाय करणं समाजमाध्यम कंपन्यांना व राजकीय पक्षांनाही अडचणीचं ठरणार आहे.

कशाहीपेक्षा आपल्या मुक्त अभिव्यक्तीच्या अधिकाराची खातरजमा केली जावी आणि संबंधित कंपन्यांना व राजकीय पक्षांना उत्तरदायी ठरवता यावं, यासाठी नवीन कायदेशीर चौकट निर्माण करण्याची गरज आहे. ही चौकट निर्माण करायची असेल तर इंटरनेटचा आपल्या राजकीय जीवनावर कसा परिणाम होतो, हे समजून घ्यावं लागेल.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (१६ फेब्रु. २०१९ या अंकातून)


**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक मिळण्याची ठिकाणे**

## मीडिया ॲडस्

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू काँप्लेक्स,
हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४

## अथर्व पब्लिकेशन्स

तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६

## सनलाईट मीडिया डिस्ट्रीब्युशन

६३८, नारायण पेठ, पॉप्युलर हाऊस बिल्डिंग, दुकान क्र.३,
अप्पा बळवंत चौकाजवळ,
पुणे ४११०३०
भ्र. ९८५०६६२९८८

## माणगावकर एजन्सी

५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५